# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं **dydpune@gmail.com**

वेब साईट क्रमांक **www.dydepune.com**


जा.क्र.उमाशि-३/११ वी प्रवेश/पुवि/२०१४

दिनांक : ७/६/२०१४ 7 JUN 2014

प्रति

मुख्याध्यापक /प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसर

विषय : इयत्ता ११ वी ऑनलाईन पध्दतीने केंद्रिय प्रवेश सन २०१४-१५ सहविचार सभा.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रं. संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२३६/१३/एसडी-२ दिनांक ८/१/२०१३
२) कार्यालयाचे पत्र जा.क्रं. उमाशि-३/११ वी प्रवेश/पुवि/२०१४/२५११-१३ दि.१/२/२०१४
३) परिपत्रक जा.क्रं.शिउसं/पुवि/उमाशि-३/११वी ऑ.प्र.प्र. २०१४-१५ दि. ६/२/२०१४
४) कार्यालयाचे पत्र जा.क्रं. उमाशि-१/११ वी प्रवेश/२०१३-१४/३४३१-३२ दि.९/२/२०१४
५) कार्यालयाचे पत्र जा.क्रं.उमाशि-२/११वीऑनलाईनप्रवेश/पुवि/२०१४/५३४८दि.६/३/२०१४
६) शासन परिपत्रक क्रं.प्रवेश-२०१४/प्र.क्र./८१/एसडी-२ दिनांक २३ मे २०१४

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाविष्ठ कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश **ऑन लाईन** पध्दतीने करण्यात येणार आहेत. या संदर्भात दिनांक ७/२/२०१४ रोजी सर्व **प्राचार्यांची** ऑनलाईन प्रवेशासंबंधीची बैठक झाली. तसेच दिनांक १७/२/२०१४ ते २८/२/२०१४ या कालावधीत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन झाले. तसेच दिनांक १९/३/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसंदर्भात एमकेसीएल प्रतिनिधीमार्फत प्रवेशाचा फॉर्म भरण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन व सूचना देण्यात आलेल्या आहेत. इ. ११ वी प्रवेश प्रक्रियेदरम्यान जी कामे करावयाची आहेत त्याबाबतच्या सर्वसाधारण सूचना, गट १ प्रवेश पूर्वतयारी, गट २ कागदपत्रे तपासणे, गट ३ अंतिम प्रवेश कार्यवाही इत्यादी माहितीचे परिपत्रक देण्यात आलेले आहे.

आता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा दुसरा अंतिम टप्पा ऑनलाईन पध्दतीने कशा प्रकारे करावयाचा आहे याबाबत सर्व प्राचार्य/उपप्राचार्य/ज्युनि कॉलेज इनचार्ज यांची सहविचार सभा **दिनांक १२/६/२०१४** रोजी **सकाळी ११.०० वाजता** आयोजित करण्यात आलेली आहे. **स्थळ : असेंब्ली हॉल, आबासाहेब गरवारे महाविद्यालय,कर्वेरोड, पुणे.** सदर सहविचार सभेत अत्यंत महत्वाच्या सूचना देण्यात येणार असल्याने स्वतः प्राचार्यांनी उपस्थिती राहणे आवश्यक आहेत प्रतिनिधी पाठवून नयेत.

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (www.dydepune.com) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. सोबत येताना सदरचे परिपत्रक आणावे.

7/6/14

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १
तथा अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे

प्रत- मा. शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्य) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १
प्रत - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे
प्रत - कार्याध्यक्ष तथा प्राचार्य, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे
कृपया सदर मूख्याध्यापक सभेसाठी **“असेंब्ली हॉल”** येथे आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.